# युवा वर्गाला आरोग्य विषयक जाणीव करून देणे गरजेचे आहे : डॉ. लक्ष्मी श्री. पॅन्डला



डॉ. लक्ष्मी पॅन्ड्रला सोबत डॉ.बी.एन.रावण, मा. शिवाजीराव पाटील, मा. अमोल कांबळे, डॉ.एम.के. कांबळे, श्री.ए.आर. महाजन, श्री.डी.एच. नाईक, मा.सुरेश पाटील, डॉ. उषा पवार, श्रीमती कामिनी मालगोंडा, मा. अमित कांबळे

**आपले आरोग्य सुदृढ ठेवायचे असेल तर आपल्या ग्रामीण परिसरात मिळणाऱ्या स्वच्छ व ताज्या भाज्या, फळे, स्वच्छ पाणी, अन्नधान्याचा वापर आपल्या आहारात करावा. आजच्या धावपळीच्या जगात पुरेशे अन्न न घेता फास्टफूड घेतले जाते त्यामुळे तुमचे आरोग्य बिघडते. त्यामुळे आज युवा वर्गाला आरोग्य विषयक जाणीव करून देणे गरजेचे आहे त्यासाठी कॉलेजमध्ये प्रबोधन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन लामी, बेंगलोर येथील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मी श्री. पॅन्ड्रला यानी केले. श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी -कोतोली ता. पन्हाळा येथील आयक्युएसी व राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ' संपुर्ण शरीर तपासणी शिबीर ' आयोजित केले होते त्यावेळी डॉ. लक्ष्मी पॅन्ड्रला बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.बी.एन. रावण होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते वृक्षाला पाणी घालून करण्यात आले. कार्यक्रमास आयक्युएसी समन्वयक श्री.ए.आर. महाजन , प्राचार्य मा.सुरेश पाटील, ज्यु. विभाग प्रमुख डॉ. उषा पवार, मा. अमोल कांबळे, मा. अमित कांबळे, श्रीमती कामिनी मलगोंड सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.एम.के. कांबळे यानी केले, आभार श्री.एम.वाय. पोवार यानी मानले तर सुत्रसंचलन श्री.डी.एच. नाईक यानी केले.**